दिनांक - 22/08/2025

# : प्रेस नोट :

सायबर पोलीस स्टेशन नांदेड यांच्या सतर्कतेमुळे तक्रारदाराचे 5,00,000/- रू होल्ड होवून तक्रारदार यांना मा. न्यायालयाचे आदेशाने परत मिळाले,

पोलीस स्टेशन विमानतळ येथे तक्रार क्र. 21909240097228 दिनांक 16.09.2024 रोजी ऑनलाईन दाखल झाली होती. यामध्ये तक्रारदार यांनी युटयूबला  एक जाहीरात पाहिली. त्यामध्ये अधीक नफयाचे आमीष दाखवल्यामूळे तक्रारदार यांनी त्यात 15,00,000/- रू गुंतवले परंतू सदरच्या कंपनीने त्यांना झालेला नफा व मुद्दल दोन्हीही परत देण्यास टाळाटाळ केल्याने  त्यांना ऑनलाईन फसवणुक झाल्याचे लक्षात आले त्यावरून ते सायबर पोलीस स्टेशन नांदेड येथे येवून तक्रार दिली. सायबर पोलीस स्टेशन नांदेड येथील अधीकारी अमंलदार यांनी तात्काळ दखल घेत. फीर्यादी यांचे 5,00,000/- रूपये होल्ड करून मा. मुख्य न्यायदंडाधिकारी 2 रे  न्यायालय नांदेड यांच्या आदेशाने तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम ही तक्रारदार यांना परत मिळाली आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक नांदेड श्री सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक भोकर श्रीमती अर्चना पाटील पो.नि वसंत सप्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे सायबरचे पोउपनि चव्हाण, पो.कॉ 1435 काशिनाथ कारखेडे, पो.कॉ. 859 दीपक राठोड यांनी पार पाडली. सदर कामगिरी बाबत बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री अबिनाश कुमार  यांनी सर्व पोलीस अधिकारी व अमंलदाराचे अभिनंदन केले आहे.

मा. पोलीस अधीक्षक साहेब नांदेड यांनी आवाहन केले आहे की आपल्या सोबत ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ 1930 या सायबर क्राईम हेल्पलाईन नंबरवर कॉल करून आपले सोबत फ्रॉड झाल्याची सविस्तर माहिती देण्यात यावी, किंवा cybercrime.gov.in या वेबसाईटवर जावून आपले सायबर क्राईम फ्रॉडची तक्रार करावी. त्यानंतर सायबर पोलीस स्टेशन नांदेड व आपले जवळचे पोलीस स्टेशनला जावून तक्रार दाखल करावी. आपण तात्काळ तक्रार दाखल केल्यास आपले पैसे परत मिळू शकतात.

जनसंपर्क पोलीस अधिकारी<br>
पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड,